# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

**(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)**

## (आस्थापना विभाग)

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५
दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- gondwanaesst@gmail.com


जा.क्र. गो.वि./आस्था./ ३६२ /२०१८ दि. ०७/०२/२०१८

## परिपत्रक

**विषय :- सोशल मीडीया महामित्र**

संदर्भ :- मा. सचिव, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय मुंबई यांचे पत्र दिनांक १८.०१.२०१८

विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील सर्व प्राचार्यांना कळविण्यात येते की, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई तर्फे **"सोशल मीडीया महामित्र"** हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमात प्रारंभी प्रत्येक तालुक्यातुन प्रत्येकी १० सोशल मीडीया महामित्र निवडले जाणार असून या १० जणांना जिल्हास्तरावर विशेष कार्यक्रमासाठी आमंत्रित केले जाईल या महामित्रांची त्या जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस आयुक्त, पोलीस अधिक्षक यांचे समवेत समाज माध्यमाच्या सदुपयोगाबाबत गटचर्चा आयोजित करून गटचर्चेअंति तालुक्यातील प्रत्येकी एका महामित्राची राज्यस्तरावर होणाऱ्या कार्यक्रमासाठी निवड करण्यात येणार आहे. या उपक्रमात सहभागी होण्याकरीता Google play store अथवा Apple च्या App Store वर **MahaMitra** हे अप्लीकेशन डाऊनलोड करावे लागेल. या अप्लीकेशनमध्ये नांव, वय, पत्ता हे तपशिल देऊन नोंदणी करावयाची आहे. ही नोंदणी प्रक्रिया दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१८ रोजी सुरू होणार असून १८ फेब्रुवारी, २०१८ पर्यंत नोंदणी करता येणार आहे. यामध्ये महाराष्ट्रातील १५ वर्षावरील कोणीही रहिवासी नि:शुल्क सहभागी होऊ शकेल. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सोशल मीडीया महामित्र उपक्रमात सहभाग नोंदविण्यासाठी संदर्भीय पत्राचे अवलोकन करून आपले महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सुचना निर्गमित करण्यात याव्यात व सदर उपक्रमात सहभाग नोंदविण्यासाठी आव्हान करण्यात यावे.

**संलग्न:-** संदर्भीय पत्र

(दिपक एस. जुनघरे)
**कुलसचिव(का.)**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

E:\Latters\Daily Letters\548

ब्रिजेश सिंह भा.पो.से.
सचिव (माहिती व जनसंपर्क)

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दि. १८ जानेवारी २०१८

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आस्थापना विभाग
आवक क्र. 446 दि. 3.2.18
जावक क्र. ........ दि. ........

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. ...... दि. ......
जावक क्र. 1/22 दि. 3.2.18

सप्रेम नमस्कार !

भारत हा तरुणांचा देश आहे, असे म्हटले जाते. भारतातील बहुतांश तरूण फेसबुक, व्हॉट्सॲप, ट्विटर, इन्स्टाग्राम वा तत्सम सोशल मीडियाचा मोठ्या प्रमाणात उपयोग करीत असतात. सोशल मीडिया हे ज्ञान आणि मनोरंजनाचे सहज उपलब्ध असे आणि प्रभावी साधन आहेच पण लोकांची मने व मते घडवण्याची ताकद सोशल मीडियामध्ये असल्याचे अनेकदा सिद्ध झाले आहे.

आधुनिक युगातील वेगवान संपर्क साधनाचा विधायक उपयोग करून घेण्यासाठी आणि तरूणांना अधिकाधिक वाव देऊन समाज अधिक विवेकी व्हावा यासाठी 'सोशल मीडिया महामित्र' हा उपक्रम राबविण्याचे राज्य शासनाने ठरविले आहे.

या उपक्रमात प्रारंभी प्रत्येक तालुक्यातून (क्षेत्रातून) प्रत्येकी १० 'सोशल मीडिया महामित्र' निवडले जातील. या १० जणांना जिल्हास्तरावर विशेष कार्यक्रमासाठी आमंत्रित केले जाईल या महामित्रांची त्या जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलिस आयुक्त, पोलिस अधीक्षक यांच्या समवेत समाज माध्यमाच्या सदुपयोगाबाबत गटचर्चा आयोजित करण्यात येईल. या गटचर्चेअंती तालुक्यातील (क्षेत्रातील) प्रत्येकी एका महामित्राची राज्यस्तरावर होणाऱ्या कार्यक्रमासाठी निवड करण्यात येईल. जिल्हास्तरावरील कार्यक्रम सर्वसाधारणत: ५ ते १७ मार्च या कालावधीत होईल.

मा. मुख्यमंत्री महोदयांच्या उपस्थितीत होणाऱ्या राज्य स्तरावरील कार्यक्रमात समाज माध्यम क्षेत्रात प्रभावी असलेले विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवरांना आमंत्रित करण्यात येईल. या कार्यक्रमात 'सोशल मीडिया महामित्र' पुरस्कार देण्यात येईल तसेच या सर्वांच्या उपस्थितीत मान्यवरांशी संवाद आयोजित करण्यात येईल. हा कार्यक्रम मार्च महिन्यात शेवटच्या आठवड्यात होईल.

या उपक्रमामध्ये सहभागी होण्याकरिता 'Google play store' अथवा Apple च्या App Store वर MahaMitra हे ॲप्लीकेशन डाऊनलोड करावे लागेल. या ॲप्लीकेशनमध्ये नाव, वय, पत्ता हे तपशील देऊन नोंदणी करावयाची आहे. ही नोंदणी प्रक्रिया दिनांक १ फेब्रुवारी रोजी सुरू होणार असून १८ फेब्रुवारीपर्यंत नोंदणी करता येणार आहे. यामध्ये महाराष्ट्रातील १५ वर्षांवरील कोणीही रहिवासी नि:शुल्क सहभागी होऊ शकेल.

आपल्या महाविद्यालयातील अधिकाधिक विद्यार्थी या उपक्रमामध्ये सहभागी होतील यासाठी आपण प्रयत्न करावेत, ही विनंती.

या उपक्रमाबाबत सविस्तर माहितीसाठी 'अनुलोम' संस्थेचे प्रतिनिधी आपल्याशी संपर्क साधून उपक्रमाशी संबंधित माहितीचे प्रसिद्धी साहित्य आपल्याकडे जानेवारी २०१८ च्या शेवटच्या आठवड्यात पोहोचवतील.

कृपया सहकार्य व्हावे.

(ब्रिजेश सिंह भा.पो.से.)

प्रति,
सर्व प्राचार्य

Dr. Dube 3/2/18

ई-मेल : dg.dgipr@maharashtra.gov.in | कार्यालय दूरध्वनी क्रमांक : ०२२-२२०२ ७९५६

Scanned by CamScanner